**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी सल्लागार "गट-अ" यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने विवक्षित कामासाठी "विधी सल्लागार गट - अ" या एका पदासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.**

---

**जाहिरात- क्र. पोमसं/२-अ/पद/विधी सल्लागार/२६/२०२०** **मुंबई, दिनांक:- २७/०२/२०२०.**

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधी सल्लागार "गट-अ" यांचे १ पद ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.**

विधी सल्लागार "गट-अ" (एकूण ०१ पद)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | मंजूर पदे |
|---|---|---|
| ०१ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | १ |
| | **एकूण** | १ |

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **विधी सल्लागार 'गट-अ' च्या पदासाठी अर्ज** असे नमूद करून दि.१५/०३/२०२० पर्यत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१, [(लक्षवेध:- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २-अ)] या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. **दि.१५/०३/२०२० नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.** अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

➢ **करारातील मासिक देय रक्कम :-**

**अ)** विधि सल्लागार, गट-अ पदांकरिता करारातील मासिक देय रक्कम ही महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीरोखीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. (शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७ डिसेंबर, २०१६ अन्वये)

➢ **शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

१. **शेक्षणिक अर्हता :-** उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल.

२. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेली अशी व्यक्ती जी महाराष्ट्र शासनाच्या शासकीय सेवेत विधि अधिकारी किंवा विधि सल्लागार या पदावर **नियमित सेवेत** १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी विधि विषयक कामकाज हाताळत होते आणि ज्या व्यक्तिस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायदेविषयक सखोल ज्ञान असेल, विशेषत: महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम, १९९९ व लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८. तसेच पोलीस विभागाच्या अनुषंगाने सर्व कायदयांचे सखोल ज्ञान, त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल.

३. **अनुभव :-**

**अ)** विधि अधिकारी, गट-अ किंवा विधि सल्लागार, गट-अ या पदावर महाराष्ट्र शासनाच्या शासकीय सेवेत अशा शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तींनीं किमान १५ वर्षे **नियमित सेवा** पुर्ण केल्याचा अनुभव आवश्यक राहील.

**ब)** उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक प्रशासनिय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशा इ. बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

**क)** उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

➢ **कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१. पोलीस महासंचालक कार्यालयात मोक्का अतंर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करणे व कायदेविषयक अभिमत देणे.

२. लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यासाठी मंजुरी मिळण्याबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे व कायदेविषयक अभिमत देणे.

३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ मधील कलम १९६, १९७ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाची छाननी करणे व त्यावर योग्य ते कायदेविषयक अभिमत देणे.

४. विविध कायदयामध्ये सुधारणा करण्याच्या प्रस्तावात कायदेविषयक सल्ला देणे, सर्व फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणात की, ज्यामध्ये पोलीस महासंचालक व गृह विभाग हे प्रतिवादी आहे, त्यामध्ये कायदेविषयक सल्ला देणे व ते हाताळणे.

५. UAPA कायदयांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करणे व त्यावर कायदेशिर अभिमत देणे. त्याचप्रमाणे सर्व न्यायालयीन प्रकरणांमध्ये drafting करण्याच्याबाबतीत हातोटी असणे आवश्यक आहे.

६. पोलीस महासंचालक यांनी वेळोवेळी नेमून दिलेल्या विविध प्रकरणांतील कायदेविषयक कामकाज हाताळणे व अभिमत देणे.

➢ **अटी व शर्ती :-**

१. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

३. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

४. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

९. सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी / अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

१०. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा, ११ महिन्यांकरिता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

११. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिका-यांने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२. उमेदवाराची निवड लेखी परिक्षेव्दारे तसेच मुलाखतीद्वारे करण्यात येईल. परिक्षेचा तसाच मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

१३. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

१४. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

१५. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/ कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१६. अर्जासोबत २.५ से.मी.X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

# अर्जाचा नमूना

विधी सल्लागार 'गट-अ' * पदाकरिता अर्ज

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाप्यात जोडावा.

**कार्यालयीन उपयोगासाठी**

1. अर्ज क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐
2. अर्ज स्विकारल्याचा दिनांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
3. अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) : ____________

---

**सूचना :** अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

\# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

1. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव

   मराठीत :______________________________

   #इंग्रजीत: ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

2. **पत्रव्यवहाराचा पत्ता:** ______________________________

   तालुका :____________ जिल्हा :____________ पीन कोड : ☐☐☐☐☐☐

3. **कायमचा पत्ता :** ______________________________

   तालुका :____________ जिल्हा :____________ पीन कोड : ☐☐☐☐☐☐

4. **दूरध्वनी क्रमांक** - लॅन्डलाईन ____________ मोबाईल क्रमांक :____________

4A. **ई-मेल :** ____________________

5. **जन्मदिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ :____________

6. दिनांक २८/०२/२०२० रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

   दिवस महिना वर्ष

7. लिंग : पुरूष ☐ / महिला ☐

8. धर्म : ____________ जात : ____________

9. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय ☐ / नाही ☐

**☼ योग्य असेल त्या ठिकाणी ( √ ) अशी खूण करावी.**

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

**10. शैक्षणिक अर्हता :**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/ महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. पदवी | | | | | |
| २. विधी पदवी | | | | | |

10अ. शासनाच्या सेवेतून विधि अधिकारी, विधि सल्लागार किंवा तत्सम पदावर शासकीय विभागात किमान १५ वर्षे नियमित सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त झाल्याबद्दलचा तपशिल:-

१) शासकीय सेवेत नियुक्त झाल्याचा दिनांक व पदनाम:-

२) शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक :-

३) शासनाच्या सेवेत असतांना विधि अधिकारी, विधि सल्लागार किंवा तत्सम पदावर नियमित स्वरुपात केलेल्या सेवेचा कालावधी:-

11. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? : होय ☐ / नाही ☐

12. अर्जदार म्हणजे करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित आहे काय ?

होय ☐

नाही ☐

** ** **

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी श्री./सौ./कु ________________________________________याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**